MHKO120003762022

# निशाणी क्रमांक ०५ वरील आदेश.

( दत्तात्रय पाटील वि. अंबाजी पाटील वगैरे )

वादीने सदर अर्ज प्रतिवादींविरुद्ध दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९, नियम १, २ अन्वये तूर्तातूर्त मनाईकरीता दाखल केला आहे.

**दावा मिळकतीचे वर्णन :-**

०२. मौजे मुदाळ, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर येथील,

| अ.क्र | गट क्र. | क्षेत्र<br>हे. आर. पॉ. | आकार<br>रु. पै. | हिस्सा<br>हे. आर. पॉ. |
|---|---|---|---|---|
| १. | ३ | ०-२५-०० | २-६९ | ०-२०-०० |
| २. | ४०६/अ | ०-१२-००<br>पो.ख.०-०३-०० | ०-६९ | संपूर्ण |
| ३. | ४०६/ब | ०-३८-००<br>पो.ख.०-०३-०० | २-३१ | संपूर्ण |

( '' **दावा मिळकती** '' संक्षिप्ता करीता )

**थोडक्यात वादीचे कथन पुढील प्रमाणे,**

०३. दावा मिळकती ह्या चवंडूबाई देवस्थान व भावेश्वरी देव यांच्या मालकीच्या असून त्यांचे व्यवस्थापक महाराष्ट्र सरकार आहे. शासनाकडून सदर शेत जमिनी वादी यांना कूळ म्हणून वहिवाटण्यास ६० वर्षापूर्वीपासून दिलेल्या आहेत. वादीने त्याबाबतचा खंड नियमितपणे देवस्थान व्यवस्थापन समिती यांच्याकडे अदा केलेला आहे. त्यानुसार दावा मिळकतीच्या ७/१२ सदरी वादी नावाच्या नोंद जमीन करणार म्हणून पीक पाहणी सदरी झालेली आहे. त्यानुसार वादी हे दावा मिळकतीमध्ये ऊस, भात, पडवळ व इतर कडधान्ये घेत आहेत. दावा मिळकतीशी प्रतिवादींचा कोणताही संबंध नाही. असे असताना यातील प्रतिवादी क्र.१ व २ यांनी वादीला, "सदर जागेशी तुमचा कोणताही संबंध नाही, सदरची जागा गावची

आहे." असे सांगून दावा मिळकत क्र.३ मध्ये वहिवाट करण्यास हरकत अडथळा निर्माण केला आहे. याबाबत वादीने भुदरगड पोलीस ठाण्यात दिनांक १४/०६/२०२२ व दिंनाक १५/०६/२०२२ रोजी तक्रार दिली आहे. त्यानंतर प्रतिवादींनी दावा मिळकतीमधील पीक तोडून नेण्याची व दावा मिळकतीमध्ये न जाण्याची धमकी वादींना दिली आहे. सबब वादीने प्रतिवादींविरुद्ध प्रस्तुत दावा दाखल केला आहे व सदर तूर्तातूर्त मनाई अर्ज दाखल करून, प्रतिवादींनी किंवा तर्फे इसमांनी दावा मिळकतीमधील वादींच्या शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत व अडथळा निर्माण करु नये, दावा मिळकतीच्या कोणत्याही क्षेत्राचा कब्जा कायदेशीर मार्गाचा अवलंब केल्याखेरीज घेवू नये व दावा मिळकतीमध्ये कोणत्याही वाहनांचे पार्किंग करू नये असा तूर्तातूर्त मनाई आदेश होणेबाबत विनंती केली आहे.

०४. प्रस्तुत प्रकरणी प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना निशाणी क्र.६ ते ११ अन्वये दाव्याचे समन्स व नोटीस लागू होवून सुद्धा ते दाव्यात हजर झाले नाहीत. सबब दिनांक ०८/०८/२०२२ रोजीच्या निशाणी क्र.१ खालील आदेशान्वये प्रस्तुत प्रकरण प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या विरुद्ध विना कैफियत व म्हणण्याविना पुढे चालविण्यात आले आहे.

०५. वादीतर्फे विधिज्ञ श्री.एस. एच. कडव यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच, अभिलेखावरील परिस्थितीचे अवलोकन केले असता, खालील प्रश्नबिंदू माझ्या विचारार्थ निघतात. त्यावरील निष्कर्ष खालील प्रमाणे कारणमिमांसेसह नोंदवत आहे.

| **अ.क्र.** | **प्रश्नबिंदू** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | वादी प्रथमदर्शनी केस सिद्ध करतात काय ? | : | होकारार्थी. |
| २. | सोईचा समतोल वादीच्या बाजूने आहे काय ? | : | होकारार्थी. |
| ३. | प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास वादीचे अतोनात नुकसान होईल काय ? | : | होकारार्थी. |
| ४. | काय आदेश ? | : | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

०६. प्रस्तुत प्रकरणी वादीने निशाणी क्र.३ सोबत, सर्व दावा मिळकतींचे ७/१२ उताऱ्यांची प्रत, ८-अ च्या उताऱ्यांची प्रत, देवस्थान कमिटीकडे भरलेल्या खंडाच्या पावत्यांची

प्रत, देवस्थान समितीने पाठविलेल्या पत्राची प्रत, तहसीलदार, भुदरगड यांचे कबुलायतन ची प्रत व पोलीस ठाण्यातील तक्रारीची प्रत हजर केली आहे.

**प्रश्नबिंदु क्रमांक १ ते ४ करिता, ( प्रथमदर्शनी केस, सोईचा समतोल, अपरिमित नुकसान व आदेश )**

०७. प्रश्नबिंदू क्र. १ ते ४ हे एकमेकांशी निगडित असल्यामुळे ते कारणमीमांसेसाठी एकत्रित विचारात घेण्यात आलेले आहेत.

०८. सकृतदर्शनी केस बघताना न्यायालयास एक गंभीर व प्रामाणिक वाद दाव्याच्या न्यायचौकशी करिता उपस्थित करण्यात आला आहे काय? हे तपासावे लागते. सकृतदर्शनी केस सिद्ध करण्याकरिता वादीस दाव्याच्या गुणदोषांवर सिद्ध करावयाची केस सिद्ध करण्याची आवश्यकता नाही. प्रस्तुत अर्जावर विचार करताना न्यायालय अभिलेखावर दाखल शपथपत्र व इतर कागदोपत्री पुरावा त्यांच्या औपचारिक सिद्धतेशिवाय विचारात घेवू शकते.

०९. थोडक्यात वादीचे असे कथन आहे की, दावा मिळकती ह्या चवंडूबाई देवस्थान व भावेश्वरी देव यांच्या मालकीच्या असून सदर मिळकती वादी यांना कूळ म्हणून वहिवाटण्यास दिलेल्या आहेत. वादीने त्याबाबतचा खंड नियमितपणे देवस्थान व्यवस्थापन समिती यांच्याकडे अदा केलेला आहे. त्यानुसार दावा मिळकतीच्या ७/१२ सदरी वादी नावाच्या नोंद जमीन करणार म्हणून पीक पाहणी सदरी झालेली आहे. सध्या वादी हे दावा मिळकतीमध्ये ऊस, भात, पडवळ व इतर कडधान्ये घेत आहेत. दावा मिळकतीशी प्रतिवादींचा कोणताही संबंध नसताना त्यांनी वादीच्या दावा मिळकत क्र.३ मध्ये वहिवाटीस हरकत अडथळा निर्माण केला आहे. याबाबत वादीने भुदरगड पोलीस ठाण्यात दिनांक १४/०६/२०२२ व दिंनाक १५/०६/२०२२ रोजी तक्रार दिली आहे. त्यानंतर प्रतिवादींनी दावा मिळकतीमधील पीक तोडून नेण्याची व दावा मिळकतीमध्ये न जाण्याची धमकी वादींना दिली आहे.

१०. मान्य परिस्थितीनुसार प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना निशाणी क्र.६ ते ११ अन्वये दाव्याचे समन्स व नोटीस लागू होवून सुद्धा ते दाव्यात हजर झाले नाहीत. सबब दिनांक ०८/०८/२०२२ रोजीच्या निशाणी क्र.१ खालील आदेशान्वये प्रस्तुत प्रकरण प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या विरुद्ध विना कैफियत व म्हणण्याविना पुढे चालविण्यात आले आहे.

११. सद्यःस्थितीमध्ये वादीची सर्व कथने विनाआव्हानीत राहिलेली आहेत. अभिलेखावरील निशाणी क्र.३ सोबत दाखल करण्यात आलेल्या दावा मिळकतींच्या ७/१२ उताऱ्यांचे अवलोकन केले असता, भोगवटदार सदरी व मालक सदरी चवंडूबाईदेवी कब्जेदार व्यवस्थापक सरकार व श्री भावेश्वरी देव व्यवस्थापक सरकार अशा नावांची नोंद असल्याचे दिसून येत आहे. तसेच दावा मिळकतीच्या जमीन करणाऱ्याचे नांव सदरी वादीच्या नावाची नोंद असल्याचे दिसून येत आहे. तसेच वादी तर्फे निशाणी क्र.३ सोबत दाखल करण्यात आलेल्या देवस्थान व्यवस्थापन समिती पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर यांनी दिलेल्या पावत्यांवर वादींच्या नावाची नोंद असून वादी यांच्याकडून खंड जमा झाल्याची नोंद दिसून येत आहे. या सर्व कागदपत्रांवरून सकृतदर्शनी वादी हे दावा मिळकतीचे कब्जेदार असल्याचे दिसून येत आहे.

१२. वादीतर्फे विधिज्ञांनी असा युक्तिवाद केला की, प्रतिवादी हे वादीच्या दावा मिळकतीमधील कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा निर्माण करत आहेत. वादीने त्यांच्या कथनांच्या पुष्ट्यर्थ निशाणी क्र.०३, अ. क्र.३६ सोबत त्यांनी प्रतिवादींविरुद्ध भुदरगड पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीची प्रत हजर केली आहे. सदर तक्रारीचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दावा मिळकतीमधील वादीच्या वहिवाटीस अटकाव केला असल्याबाबत तक्रार दिली असल्याचे दिसून येत आहे. सदरची तक्रार वादीच्या कथनास सद्यःस्थितीमध्ये भक्कमपणे पुष्टी देत आहे.

१३. मान्य परिस्थितीनुसार, प्रतिवादी हे त्यांना प्रकरणाची समन्स व नोटीस लागू होवून सुद्धा हजर झालेले नाहीत. त्यामुळे, वादींची सर्व कथने ही विनाआव्हानीत राहिलेली आहेत. वरील सर्व कारणमीमांसेवर प्रथमदर्शनी, प्रतिवादी हे दावा मिळकतीमधील वादींच्या कब्जेवहिवाटीस हरकत व अडथळा निर्माण करत असल्याचे दिसून येत आहे. परिणामतः प्रथमदर्शनी केस व सोईचा समतोल वादीच्या बाजूने आहे. जर, प्रतिवादींनी वादीच्या दावा मिळकतीमधील कब्जे वहिवाटीस हरकत व अडथळा निर्माण केल्यास दावा मिळकतीमधील शेतीचे व पिकांचे अतोनात नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे, अपरिमित नुकासनीचे तत्त्व देखील वादीच्या बाजुने आहे. परिणामतः प्रश्नबिंदू १ ते ३ यांना होकारार्थी निष्कर्ष नोंदवितो व न्यायाचे उद्दिष्ट साधण्याकरिता पुढील आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश.</u>

१. तूर्तातूर्त मनाई अर्ज खालील प्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

अ. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी किंवा त्याच्या मार्फत कोणत्याही इसमाने दावा मिळकतीमधील वादीच्या कब्जेवहिवाटीस हरकत व अडथळा निर्माण करु नये, दावा मिळकतीच्या कोणत्याही क्षेत्राचा कब्जा कायदेशीर मार्गाचा अवलंब केल्याखेरीज घेवू नये व दावा मिळकतीमध्ये कोणत्याही वाहनांचे पार्किंग करू नये असा तूर्तातूर्त मनाई आदेश देण्यात येत आहे.

२. खर्चाचा आदेश मूळ दाव्यात समाविष्ट करण्यात येत आहे.

Digitally signed by VASIM BURAN MULLA
Date: 2022.11.05 17:09:22 +0530

स्थळ : गारगोटी. ( **व्ही. बी. मुल्ला** )

दिनांक : ०५/११/२०२२. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गारगोटी.